**मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकरिता Project Manager (Level-7) व Social Media Expert अशा दोन अतिरिक्त तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवा बाह्ययंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.५०/निवडणूक-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई- ४०० ०३२
**दिनांक : १७ जून, २०२६**

**<u>प्रस्तावना</u> :-**

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकरिता विविध तांत्रिक कामांसाठी विहीत मार्गाचा अवलंब करुन बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळाच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात येतात. सद्य:स्थितीत महाराष्ट्रात सुरु होणारा मतदार याद्यांच्या पुनरिक्षणाचा कार्यक्रम (Special Intensive Revision) (SIR-2026) व त्या कार्यक्रमाची तयारी तसेच कामाचा मोठा आवाका पाहता, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयास मतदार याद्यांच्या पुनरिक्षणाचा कार्यक्रमाकरिता एक Project Manager (Level-7) व एक Social Media Expert अशा एकूण दोन अतिरिक्त तांत्रिक मनुष्यबळाच्या सेवेची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच सदर संक्षिप्त पुनरिक्षणाचा कार्यक्रम ७-८ महिन्यांच्या कालावधीपर्यंत सुरु राहणे अपेक्षित आहे. यास्तव, मतदार याद्यांच्या पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकरिता Project Manager (Level-7) व Social Media Expert हे दोन तांत्रिक मनुष्यबळ रुजू झाल्याच्या दिनांकापासून ते दि.३०/०९/२०२६ या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेण्याची बाब विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> : -**

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयास मतदार याद्यांच्या पुनरिक्षण कार्यक्रमाकरिता एक Project Manager (Level-7) व एक Social Media Expert असे एकूण दोन तांत्रिक मनुष्यबळ रुजू झाल्याच्या दिनांकापासून ते दि.३०/०९/२०२६ पर्यंत या कालावधीसाठी बाह्ययंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेण्यास वित्त विभाग, शासन निर्णय दि.०९/०६/२०१७ अन्वये गठीत उपसमितीने चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन नमूद दोन तांत्रिक मनुष्यबळांची सेवा रुजू झाल्याच्या दिनांकापासून ते दि.३०/०९/२०२६ पर्यंत उपलब्ध करुन घेण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त संबंधित तांत्रिक मनुष्यबळांच्या सेवा विहित मार्गाने निविदा प्रक्रिया राबवून स्पर्धात्मक व निम्नत्तम दराने उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.

३. या करिता होणारा खर्च लेखाशिर्ष २०१५-निवडणूक अंतर्गत, १०३-मतदार याद्या तयार करणे व त्यांचे मुद्रण, (००) (०१) मतदार याद्या तयार करणे व त्यांचे मुद्रण, १०-कंत्राटी सेवा, सांकेतांक-२०१५००३२ या लेखाशिर्षाखालील आर्थिक वर्ष सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय दि.०९/०६/२०१७ अन्वये गठीत उप समितीने चक्रिय पध्दतीने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१३५/आपुक, दि.२०/०५/२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६१७१४५२०५५८०७ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL SURESH SONAR

Digitally signed by SUNIL SURESH SONAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=65c5686107ad17321b26a7dcc66d1098655693c28b750301d0e92220965b0095, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9943B9C43B20EF0EDC259749498600709E128347F867F9400CA5678C69418E81, cn=SUNIL SURESH SONAR
Date: 2026.06.17 14:52:56 +05'30'

**(सुनील सोनार)**
**अवर सचिव तथा उप मुख्य निवडणूक अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत :-**

(१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
(२) महालेखापाल (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
(३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
(४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
(५) वित्त विभाग, व्यय-४ / आपुक मंत्रालय, मुंबई
(६) अवर सचिव (कार्या-२६ / रोख शाखा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
(७) अवर सचिव (निवडणूक-३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
(८) निवडनस्ती